महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

| | |
|---|---|
| दुरध्वनी- ०२५३-२३११२०१/२५७५१०८, फॅक्स- २३११२०१<br>ई-मेल- hfwtcnsk1@gmail.com / hfwtcnsk@gmail.com | जिल्हा रुग्णालय नाशिक आवार, नविन सीबीएस जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक |
| जा. क्र.आवकुकप्रकेना/भांडार/लेखनसामुग्रीख/१८८२/२०२६ | दिनांक - १६/१०/२०२६ |


# जाहीर नोटीस (दरपत्रके आमंत्रण पत्र)

सुचित करणेत येते की, प्राचार्य,आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र,नाशिक या कार्यालया मार्फत प्रशिक्षण केंद्रास लागणारे लेखन सामुग्री व इतर साहित्य यांची दरनिश्चिती करण्या करिता दरपत्रके मागविण्यात येत आहे. तरी इच्छुक स्थानिक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा व खाली दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधील (खालील अ.क्र.१२ नुसार) प्राचार्य,आरोग्य व कुंटुब कल्याण प्रशिक्षण केद्र जिल्हा रुग्णालय आवार,नाशिक येथे सादर करावीत. स्थानिक दरपत्रकधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

## दरपत्रके सादर करणा-यां पुरवठाधारकांसाठी सर्वसाधरण अटी शर्ती

१) इच्छुक स्थानिक पुरवठाधारकांनी बाबनिहाय (Itemwise) दरपत्रके मोहरबंद लिफाप्यात सादर करावीत. यावर सदर जाहीर नोटीस जावक क्रमांक व दिनांक व ज्या बाबीचे दर सादर केलेले आहे. त्याचे नांव असावे.

२) यादीमधील लेखन सामुग्रीची खरेदी आवश्यकते नुसार मागणी केली जातील.

३) दरपत्रकात **दर हे सर्व करांसहित** असावे. विहीत नमुन्यातील वस्तु व सेवा कर(GST) सहीत देयके स्विकारण्यात येतील.

४) **दर हे अधिकतम विक्री किमंतीपेक्षा (MRP) जास्त नसावे.** वस्तू व सेवांच्या दराबाबत शासकिय खरेदी बाबतच्या मार्गदर्शक सुचना,शासन निर्णय, परिपत्रक यांचे पालन करणे बंधनकारक असले.

५) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक निविदा नाकारण्यात येतील. उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/निविदा सादर करणार असतील तर एक व्यक्तीजी "कंपनी एक्स" चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती "कंपनी वाय" चा मालक/संचालक/भागिदार/बहुसंख्य भागधारक नसावी.

६) **आपल्या व्यापारी संस्थेचा वस्तु व सेवा कर क्रमांक (GST Number) प्रमाणपत्र व पॅन कार्ड छायांकित प्रत सांक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे.**

७) दरपत्रके सादर करणेसाठी पत्ता/ठिकाण - प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक जिल्हा रुग्णालय आवार, नाशिक त्र्यंबकरोड, नाशिक पिन कोड-४२२००२.

८) **प्रशिक्षण सत्र निहाय पुरवठा आदेश देण्यात येईल.**

९) **पुरवठा आदेश दिल्यानंतर २४ तासाच्या आत पुरवठादारास सदरील वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक असेल.**

१०) विहीत कालावधीत सेवा उपलब्ध न झाल्यास शासकिय नियमानुसार दंडात्मक कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

११) मंजूर न्युनतम दरांवर पुरवठाधारकास पुरवठा करणे शक्य न झाल्यास व वाढीव दराने खरेदी करावी लागल्यास फरकाची रक्कम या कार्यालयाकडून अदा केली जाणार नाही.

१२) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांका पासून कार्यालयीन सुट्टी चे दिवस वगळून सातव्या दिवसाच्या **(दि.२६/१०/२०२६ पर्यंत) संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत असेल.उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१३)**दरपत्रके उघडण्याची दिनांक २६/१०/२०२६ संध्याकाळी ५.३० वा किंवा** या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

१४)कोणतेही लेखी तोंडी कारण न-देता दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा किंवा संपूर्ण अथवा अंशतः खरेदी प्रक्रिया रद्द करण्याचा व खरेदीचे सर्व अधिकार प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक यांनी राखून ठेवले आहेत.

१५)मान्य न्युनतम दर एक वर्ष वैध राहतील.

१६)**दर हे पुर्णांकीत रुपयात असावे**.

१७)या कार्यालयाने व्यापारी लिफाफात ज्या वस्तुचा व कंपनीचा उल्लेख केला आहे त्याच कंपनीच्या वस्तुचे दर नमुद करावे.

१८)ज्या वस्तुच्या पुढे (*) असे चिन्ह आहे. अशा वस्तुंचे छायाचित्र दरा सोबत जाडून वस्तुचा क्रमांक छायाचित्रावर नमुद करावा.

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE * NASIK *

(डॉ.दा[illegible]ल श्रीहरी साळवे)
प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक

प्रत- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संकेतस्थळावर व या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर.

## व्यापारी लिफाफा

सन २०२६-२७ साठी आरोग्य व कु.क.केंद्र नाशिक येथे प्रशिक्षणासाठी व कार्यालयासाठी साहित्य व स्टेशनरी करीता दरपत्रक मागविणे बाबत

| अ.क्र. | तपशिल | एकुण संख्या | दर रुपये (सर्व करा सहित |
|---|---|---|---|
| **१** | **झेरॉक्स कागद ( ए ४ साईज) ७० जीएसएम (जेके ईझी कॉफी)** | **१ रिम** | |
| २ | झेरॉक्स कागद (लिगल साईज) (जेके ईझी कॉफी) | १ रिम | |
| **३** | **बॉल पेन (स्टायलीस्ट एक्स ३)** | १ नग | |
| **४** | **नोटपॅड (सुंदरम ४० पेजेस)** | १ नग | |
| **५*** | **फोल्डर बटण बॅग प्रशिक्षणासाठी** | १ नग | |
| ६ | जेल पेन (सेलो फलोअर) | १ नग | |
| **७** | **युज ॲन्ड थ्रो पेन (निळा,काळा,लाल) रेग्युलर** | **१ नग** | |
| **८** | **नोटपॅड (सुंदरम १० पेजेस)** | **१ नग** | |
| ९ | पाण्याची बाटली (मेटल-थरमल) (७५० एमएल) सोलीमो स्टेलनेस स्टील | १ नग | |
| १० | पाण्याची बाटली (मेटल-थरमल) (१००० एमएल) सोलीमो स्टेलनेस स्टील | १ नग | |
| ११ | पाण्याची बाटली (मेटल-थरमल) (मिल्टन ७५० एमएल) | १ नग | |
| १२ | पाण्याची बाटली (मेटल-थरमल) (मिल्टन १००० एमएल) | १ नग | |
| **१३** | **पॅड(लाकडी परिक्षा पॅड)** | **१ नग** | |
| १४ | कार्डसिट फुल साईज | १ नग | |
| १५* | ऑफिस बॅग (लेदर) | १ नग | |
| १६* | ऑफिस बॅग सॅग | १ नग | |
| १७* | ज्युटची बॅग | १ नग | |
| १८ | पेन्सिल सेल AA Eveready | १ नग | |
| १९ | सेल AAA Eveready | १ नग | |
| २० | फुलस्कॅप रिम (७० जीएसएम) | १ रिम | |
| **२१** | **फोटो पेपर ए ४ साईज (१८० जीएसएम)** | **५० पेपर** | |

टिप:- ज्या वस्तुच्या पुढे (*) असे चिन्ह आहे. अशा वस्तुंचे छायाचित्र दरा सोबत जोडून वस्तुचा क्रमांक छायाचित्रावर नमुद करावा.

सही
पुरवठा धारकांचे नांव...........
पुरवठा संस्थेचे नांव............
पत्ता....................

(डॉ.दावल श्रीहरी साळवे)
प्राचार्य
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक